सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०१७–१८/५९६ दि. ०९/०१/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **फक्त पुणे जिल्हयातील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :** शासनाचे मुखपत्र 'लोकराज्य' मासिक व शासन प्रकाशित विविध पुस्तकांचे स्टॉलबाबत...
**संदर्भ :** १. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, क्र. ससं/उशि/पुवि/आस्था/२०१७/३०१६, यांचे दि. २७ डिसेंबर २०१७ चे पत्र.
२. उपसंचालक, (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. ३०९६/२०१७, दि. २२/१२/२०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने **'लोकराज्य'** हे शासनाचे मुखपत्र दरमहा प्रकाशित करण्यात येते. शासनाने घेतलेल्या निर्णयाचे प्रतिबिंब या अंकात पाहायला मिळते. दर्जेदार मजकूर, आकर्षक व सप्तरंगी अंक प्रकाशित होत असल्यामुळे या मासिकाचा खप चार लाखांवर आहे. या अंकातील सर्वच मजकूर वाचनीय व वैशिष्टयपूर्ण असतो. सर्वसामान्य लोकांना माहिती होण्यासाठी महत्त्वाच्या कार्यक्रमाप्रसंगी **'लोकराज्य'**चे स्टॉल ठिकठिकाणी लावले जातात.

महाराष्ट्र वार्षिकी २०१७ या पुस्तकामध्ये सर्व जिल्हयाची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, आद्योगिक, शैक्षणिक, कृषी, आर्थिक माहिती तसेच शासनाने घेतेलेले महत्वाचे निर्णय, तसेच राज्यमंत्री खासदार, आमदार, यांची माहितीही प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. हे पुस्तक शासनाचे वरिष्ठ अधिकारी, विद्यार्थी व नागरिक यांना अभ्यासासाठी आणि संदर्भासाठी अत्यंत उपयुक्त आहे. तसेच महामानव हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील माहितीपूर्ण पुस्तकही या महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालय/संस्थेतील शिक्षक, विद्यार्थी, इतर कर्मचारी व येणाऱ्या अभ्यागतांना उपरोक्त सर्व प्रकाशनाची माहिती व्हावी, याकरिता मा. उपसंचालक, (माहिती), पुणे यांनी निर्देशित केल्यानुसार आपल्या महाविद्यालय/संस्थेत सदर स्टॉल लावण्याकरिता सहकार्य करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

दूरध्वी क्रमांक ०२०-२६१२७८३३ E-mail : jdhepune.gmail.com फॅक्स ंबर ०२०-२६०५१६३२


क्र. ससं/उशि/पुवि/आस्था/२०१७/3016 दि. /१२/२०१७

27 DEC 2017

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 4538
दिनांक - 29/12/2017
जावक दिनांक -


प्रति,

कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ,
पुणे

**विषय - शासनाचे मुखपत्र 'लोकराज्य' मासिक व शासन प्रकाशित विविध पुस्तकांचे स्टॉल लावण्यास परवानगी देण्याकरिता सर्व महाविदयालयांना निर्देश करण्याबाबत**

संदर्भ - उपसंचालक,(माहिती)विभागीय माहिती कार्यालय,पुणे यांचे पत्र क्र.३०९६ दि. २२/१२/२०१७

उपरोक्त विषयाबाबतचे उपसंचालक, (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे यांचे संदर्भाधीन पत्र जोडले आहे. सदरच्या पत्रात नमूद केल्यानुसार सदरची बाब आपल्या स्तरावरुन विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/अनुदानित महाविदयालयांना परिपत्रकाद्वारे निदर्शनास आणावे.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - उपसंचालक (माहिती ), विभागीय माहिती कार्यालय पुणे, नवीन मध्यवर्ती इमारत, तळ मजला ससून रूग्णालयासमोर, पुणे.

D:\establishment/sankirn patravyavhar

संचाल क (माहिती)
विभागीय म हेती कार्यालय,
माहिती व संपर्क महासंचालनालय,
नवीन मध्य गीं इमारत, तळ मजला,
ससून रुग्णा ालयासमोर, पुणे - ४११००१.

**महाराष्ट्र शासन**

दूरध्वनी : ०२०-२६१२३४३५,
फॅक्स : ०२०-२६११९५२०
Email : ddpune@gmail.com
https://www.facebook.com/ddipune/
https://twitter.com/ddipune
https://youtube.com/c/DydirectorPune/
https://ddipune.blogspot.com/

जा. क्र. विमाका/पुणे/उपसंचालक (मा.)/30 ९९/२०१७
दिनांक : २२/१२/१७.

प्रति
मा. शिक्षण सह संचालक,
शिक्षण संचालनालय,
पुणे

आवक क्र. 7124
दिनांक 26 DEC 2017

**विषय:- शासनाचे मुखपत्र 'लोकराज्य ' मासिक व शासन प्रकाशित विविध पुस्तकांचे स्टॉल लावण्यास परवानी देण्याकरीता सर्व महाविद्यालयांना निर्देश करण्याबाबत..**

महोदय,

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने ' **लोकराज्य** ' हे शासनाचे मुखपत्र दरमहा प्रकाशित करण्यात येते. शासनाने घेतलेल्या निर्णयाचे प्रतिबिंब या अंकात पाहायला मिळते.

दर्जेदार मजकूर, आकर्षक व सप्तरंगी अंक प्रकाशित होत असल्यामुळे या मासिकाचा खप चार लाखांवर आहे. अंकातील सर्वच मजकूर वाचनीय व वैशिष्ट्यपूर्ण असते. सर्वसामान्य लोकांना माहिती होण्यासाठी महत्त्वाच्या कार्यक्रमाप्रसंगी लोकराज्यचे स्टॉल ठिकठिकाणी लावले जातात.

महाराष्ट्र वार्षिकी २०१७ या पुस्तका मध्ये सर्व जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक, कृषी, आर्थिक, शासनाने घेतलेले महत्वाचे निर्णय, तसेच राज्यमंत्री मंडळ, खासदार, आमदार, यांची माहिती प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. हे पुस्तक शासनाचे वरिष्ठ अधिकारी, विद्यार्थी व नागरिक यांना अभ्यासासाठी आणि संदर्भासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

तसेच महामानव हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेवरील माहितीपूर्ण पुस्तक ही या महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.

उपरोक्त सर्व प्रकाशने **आपल्या अधिनस्त येणाऱ्या महाविद्यालयातील प्रोफेसर, विद्यार्थी , इतर कर्मचारी व विद्यापीठात येणाऱ्या अभ्यांगतांना याची माहिती व्हावी, याकरीता पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालयामध्ये स्टॉल लावायचा आहे. याकरीता कृपया आपल्या स्तरावरुन सर्व महाविद्यालयांना स्टॉल लावण्याकरीता सहकार्य करण्याकरीता परिपत्रक निर्गमित करावे** व त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

(मोहन राठोड)
उपसंचालक (माहिती)
पुणे विभाग, पुणे

D/: 15/लोकराज्य/97

सादर -
संदर्भी परिपत्रक सर्व महाविद्या पाठवावे असे वाटते
आदेशार्थ सादर
विद्यापीठास त्यांचे स्तरावरून महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्याबाबत अवगत करणे योग्य राहिल असे वाटते.
26/12/2017